PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sattadhish
Year: 2000

Song: Birubachya navan changbhal
Lyricist: Jagdish Khebudkar

बिरूबाच्या नावानं चांगभलं
बिरूबाच्या नावानं चांगभलं
हो...हो...हो...
अरं ढोलासंगं धनगराचा बसलंया मेळ गं
ढोलासंगं धनगराचा बसलंया मेळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
ढोलासंगं धनगराचा बसलंया मेळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं

राजासंगं राणी कशी संसारात नांदली
संसारात नांदली
हो संसारात नांदली
सुखाची ही ठेव जणू पदरात बांधली
पदरात बांधली
हो पदरात बांधली
डोरलं तुजं तुटलं गं
लेकरू भी मुकलं गं
डोरलं तुजं तुटलं गं
लेकरू भी मुकलं गं
ओ हो हा...
अन् असा कसा एकाएकी उलटला काळ गं
अन् असा कसा एकाएकी उलटला काळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं

वावटळ आलं तरी दिवटी नाही इझली
दिवटी नाही इझली हो
दिवटी नाही इझली
डोळ्यामधी ठिणगी जशी लपलीया बिजली
लपलीया बिजली
हो लपलीया बिजली
धीर देई धरती गं
झाड माया करती गं
धीर देई धरती गं
झाड माया करती गं
ओ हो ओ
अन् डोईवरी सावली हे देतया आभाळ गं
डोईवरी सावली हे देतया आभाळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं

संकटाचं डोंगर तू टाकशील उलथूनी
टाकशील उलथूनी
तू टाकशील उलथूनी
अन् पापाची गं टोळधाड लावशील परतूनी
लावशील परतूनी
तू लावशील परतूनी
मर्दीनी तू भिवू नको ओ...
घोर जीवा लावू नको
मर्दीनी तू भिवू नको

Literacy for a Billion

घोर जीवा लावू नको
ओ हो ओ
अन् शांत ठेवी मन तुजं कसोटीची येळ गं
शांत ठेवी मन तुजं कसोटीची येळ गं

आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं

ढोलासंगं धनगराचा बसलंया मेळ गं
ढोलासंगं धनगराचा बसलंया मेळ गं
आगींच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
आगीच्या या धगीसंग वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
वाघिणी तू खेळ गं
वाघिणी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*